JAMSHRI REALTY LIMITED

CIN: L17111PN1907PLC000258 : GST:27AAACT5098E1Z7
Regd. Office: Fatehchand Damani Nagar, Station Road, Solapur- 413001

Admn. Office: 601-B, Motimahal, 195, J.T. Road, Backbay Reclamation, Churchgate, Mumbai 400020.
PHONE:022- 45782579 E-MAIL: jammill1907@gmail.com

Date: 04.08.2026

Department of Corporate Services,
The Bombay Stock Exchange,
1st Floor, New Trading Ring, Routunda Building,
P.J. Towers, Dalal Street, Fort, Mumbai - 400 001.

Sub: Submission Of News Paper Notice of Annual General Meeting (AGM)

Dear Sir,

Pursuant to Regulation 30 of the Listing Regulations, please find enclosed copies of newspaper notices given in accordance with applicable provisions of the Listing Regulations and the Companies Act, 2013 read with Rules made thereunder. inter alia, informing them about 118th Annual General Meeting of the Company.

You are requested to take the above information on your record.

Thanking you,

Yours faithfully,

For Jamshri Realty Limited

RAJESH DAMANI Digitally signed by RAJESH DAMANI Date: 2026.08.04 14:43:00 +05'30'

Rajesh Damani
Joint Managing Director

वेतनासाठी १४.५७ कोटींचा निधी वितरित

तब्बल ९ महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर जलजीवन मिशन कर्मचाऱ्यांना दिलासा

- चार महिन्यांचे वेतन मिळणार
- उर्वरित पाच महिन्यांचा निधी लवकर देणार
- मुंबईतील आंदोलन स्थगित

आंदोलन तात्पुरते स्थगित

जल जीवन मिशनच्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने मुंबईत ३ ऑगस्टपासून होणारे आंदोलन स्थगित केले आहे. मात्र, उर्वरित ५ महिन्यांचे वेतन आणि स्वच्छ भारत मिशन कर्मचाऱ्यांची थकबाकी तातडीने अदा करण्याची मागणी कायम आहे. - रमाकांत गायकवाड, अध्यक्ष राज्य कृती समिती.

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३ ऑगस्ट -

राज्यातील जलजीवन मिशनमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या तब्बल नऊ महिन्यांपासून रखडलेल्या वेतनाचा प्रश्न अखेर मार्गी लागत आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य शासनाने १४ कोटी ५७ लाखांचा निधी जिल्हास्तरावर वितरित केला आहे. त्यामुळे चार महिन्यांचे थकीत वेतन अदा करता येणार आहे. या घडामोडीनंतर ३ ऑगस्टपासून मुंबईत होणारे आंदोलनही स्थगित केले आहे.

उर्वरित वेतनही लवकर द्या

सध्या चार महिन्यांच्या वेतनाचा प्रश्न सुटला असला तरी उर्वरित पाच महिन्यांचे वेतनही लवकरात लवकर मिळणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री शिंदे आणि मंत्री गुलाबराव पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल आभार. - सचिन जाधव, कार्याध्यक्ष

संबंधित कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित वेतनाच्या प्रश्नावर राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या स्तरावर बैठका झाल्या. बैठकीत जिल्हास्तरीय जलजीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन तसेच तालुकास्तरील बीआरसी, सीआरसी आणि वॉश प्रकल्पातील कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत सकारात्मक निर्णय झाला. राज्य कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड, कार्याध्यक्ष सचिन जाधव, उपाध्यक्ष ऋषीकेश शिलवंत आणि बंडू हिवरे यांनी यासाठी पाठपुरावा केला. आमदार सुधीर मुनगंटीवार यांनीही शासनाकडे पुढाकार घेतला.

वितरित निधीपैकी जिल्हास्तरीय कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी २ कोटी ९२ लाख, बीआरसी- सीआरसी कर्मचाऱ्यांसाठी ७ कोटी २६ लाख आणि वॉश प्रकल्पातील अभियंते व डेटा एंट्री ऑपरेटर यांच्या वेतनासाठी ४ कोटी ३८ लाख इतका निधी उपलब्ध केला आहे. प्रकल्प संचालक डी. गंगाथरण यांच्या पुढाकारामुळे निधी तातडीने जिल्हास्तरावर वर्ग केला. दरम्यान, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्याच्या हिस्स्यातील निधीही उपलब्ध झाला आहे. तो याच आठवड्यात जिल्ह्यांना वितरित करणार असल्याचे सांगितले आहे. केंद्र शासनाकडेही निधीची मागणी केली असून उर्वरित आर्थिक तरतुदीबाबत पाठपुरावा सुरू आहे.

'घरकुल'च्या कामात दिरंगाई नको

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांचा अधिकाऱ्यांना स्पष्ट इशारा

- आठवड्याला प्रगतीचा लेखाजोखा
- प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे निर्देश

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३ ऑगस्ट -

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या अध्यक्षतेखाली विविध घरकुल योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी शासकीय विविध घरकुल योजनांच्या कामात दिरंगाई चालणार नाही, असा स्पष्ट इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी अधिकाऱ्यांना दिला.

बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-१ व टप्पा-२, आवास प्लस सर्वेक्षण, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना तसेच मोदी आवास योजना ग्रामीण यांच्या तालुकानिहाय प्रगतीचा बारकाईने आढावा घेण्यात आला. प्रलंबित प्रकरणे, मंजुरी, हप्ते वितरण, अपूर्ण घरकुले तसेच लाभार्थ्यांच्या अडचणींची सखोल चर्चा झाली. प्रत्येक प्रलंबित प्रकरण तातडीने निकाली काढून निर्धारित उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्य जैन यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

घरकुल योजनांचा आढावा दर आठवड्याला घेणार असून, प्रत्येक तालुक्याच्या कामगिरीवर सातत्याने लक्ष ठेवणार आहे. उद्दिष्टपूर्तीत हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होईल. तसेच लाभार्थ्यांना वेळेत घरकुलाचा लाभ मिळण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असेही निर्देश दिले. यावेळी प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, चंद्रशेखर जगताप तसेच जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी उपस्थित होते.

सोपल बंगला स्फोटक फेकणेप्रकरणी पाच आरोपींचा अटकपूर्व जामीन नामंजूर

सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण आदेश

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. ३ ऑगस्ट -

आमदार दिलीप सोपल यांच्या बंगल्यावर विधानपरिषद निवडणूक निकालाच्या रात्री जळते फटाके फेकून आग लावण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी बार्शी अतिरिक्त सत्र न्यायाधीश आर. एस. रोटे यांनी आणखी पाच आरोपींचे अटकपुर्व जामीन नामंजूर केले आहेत. नाथा मोहिते, योगेश लोंढे, आशिष शिंदे, राज देवकुळे आणि कुणाल खांडारे अशी त्या आरोपींची नावे आहेत.

बार्शी शहर पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यानुसार आरोपींनी जळते रॉकेट फटाके वापरुन फिर्यादीच्या घरासह परिसरातील झाडांना आग लावण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. या घटनेत सोलर पॅनेलसह झाडांचे सुमारे १.५० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा तपास यंत्रणेने न्यायालयासमोर मांडला. सरकार पक्षाने आरोपींना अटकपूर्व जामीन दिल्यास ते पुराव्यांमध्ये छेडछाड करु शकतात, साक्षीदारांवर दबाव आणू शकतात आणि तपासात अडथळा निर्माण करु शकतात, असा युक्तिवाद केला. न्यायालयाने पोलिसांचा अहवाल, पंचनामा आणि अग्निशमन विभागाचा अहवाल विचारात घेतला. घटनास्थळावरुन वायरने बांधलेले २५ व ३० रॉकेट फटाक्यांचे संच जप्त झाल्याची नोंद आदेशात केली आहे. निवडणुकीतील विजय साजरा करण्यासाठी एवढ्या प्रमाणात रॉकेट फटाक्यांचा वापर होत नसल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने या कृत्यामागे वेगळा हेतू असल्याचे प्रथमदर्शनी नमूद केले आहे.

तपास अद्याप अपूर्ण असून आरोपींची कोठडीतील चौकशी आवश्यक आहे. तसेच काही आरोपींविरुद्ध पूर्वीचे गुन्हे नोंद असल्याची बाबही न्यायालयाच्या निदर्शनास आली. या सर्व बाबींचा विचार करुन अटकपूर्व जामीन मंजूर करणे योग्य ठरणार नाही, असा निष्कर्ष नोंदवत न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले. याच गुन्ह्यात यापूर्वी अटक केलेले प्रशांत रणझुंजारे (रा. राऊत चाळ, बार्शी), निखिल रणझुंजारे (रा. राऊत चाळ, बार्शी) आणि नागेश मोहिते (रा. राऊत चाळ, बार्शी) यांचे नियमित जामीन अर्जही न्यायालयाने फेटाळले होते. सुनावणीदरम्यान आरोपींतर्फे ॲड. राज पाटील व ॲड. प्रवीण करंजकर, सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. दिनेश देशमुख, तर फिर्यादीच्यावतीने ॲड. विकास जाधव व ॲड. प्रशांत घोडके यांनी काम पाहिले.

दुचाकी घसरून जखमी झालेल्या तरुणाचा मृत्यू

सोलापूर : दुचाकीच्या पाठीमागे बसून प्रवास करीत असताना खाली कोसळून जखमी झालेला जयंत जावळे (वय २६ रा.समाधान नगर अक्कलकोट रोड सोलापूर) हा तरुण सोलापुरातील एका खाजगी रुग्णालयात उपचार घेताना आज सोमवारी सकाळच्या सुमारास मयत झाला. जयंत जावळे हा ९ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास शहरातील जोशी गल्ली येथून घराकडे दुचाकीच्या पाठीमागे बसून निघाला होता. वाटेत दुचाकी घसरल्याने तो खाली कोसळून गंभीर जखमी झाला होता. तो उपचारा दरम्यान सोमवारी सकाळी मयत झाला.

मेव्हण्याकडून तलवारीने हल्ला; भाऊजी जखमी

बार्शी : घरगुती भांडणाच्या कारणावरून मेव्हण्याणे तलवारीने हल्ला करून भाऊजीला जखमी केल्याची घटना सात रस्ता परिसरातील हूमा मेडिकल च्या पाठीमागे आज सोमवारी सायंकाळी सहा वाजता घडली. सिद्दिक सलीम शेख (वय ४८, रा. इमाम वाडा, लष्कर सोलापूर) असे जखमी इसमाचे नाव आहे. मेव्हना फैजू बखत्यारी, व इतर तिघांनी तलवार, पाईप व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. या घटनेचा तपास पोलिस करीत आहेत.

महत्वाचे...

दुसऱ्या महिलेच्या संबंधावरुन विवाहितेचा छळ; पतीसह तिघांवर गुन्हा दाखल

सोलापूर, दि. २ ऑगस्ट-

दुसऱ्या महिलेची असलेल्या संबंधाबाबत काहीच विचारायचे नाही असे म्हणून एका विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह तिघांवर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सागर-नवरा, संगिता-सासू, आकाश-दिर (रा. रमेश्वर कॉलनी, ता. जि. जळगाव) अशी गुन्हा दाखल आरोपींची नावे असून याबाबत प्रिया सागर पाटील (रा. न्यु बुधवार पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी सन २०२१ ते दि. ३० जून २०२६ दरम्यान सासरी नांदत असताना नवऱ्याचे दुसऱ्या महिलेसोबत संबंध असलेबाबत विचारणा केली असता आरोपीनी फिर्यादीस तिचेबाबत काहीच विचारायचे नाही असे म्हणून फिर्यादीस शिवीगाळ, मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी देवून फिर्यादीचा शारीरीक व मानसिक छळ केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार वाडीकर हे तपास करीत आहे.

बहिणीला छेडल्याचा जाब विचारणाऱ्या भावाला चाकूने मारहाण

सोलापूर, दि.२ ऑगस्ट-

माझ्या बहिणीला का छेडता? अशी विचारणा केल्याच्या कारणावरून चाकू आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत भाऊ जखमी झाला. ही घटना तिऱ्हे (ता.उत्तर सोलापूर) येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. प्रेम अनंत कस्तुरे (वय-१८ रा. हिंगोली, ता.मोहोळ) असे जखमी तरुणाचे नाव आहे. शनिवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास त्याला ऋषिकेश मल्हाव, बालाजी मल्हाव आणि अन्य तिघांनी मिळून मारहाण केली. त्याला उपचारासाठी अभिषेक (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

पूर्वीच्या भांडणावरुन तलवारीने मारहाण

सोलापूर, दि.२ ऑगस्ट-

जुन्या भांडणातून कोयता आणि तलवारीने केलेल्या मारहाणीत तरुण जखमी झाला. ही घटना बरूर (ता.दक्षिण सोलापूर) येथील ए-वन धाब्याजवळ शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. शेखर भीमाशंकर मकनापुरे (वय २८ रा.बरूर) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. शनिवारी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास गावातील ए-वन ढाब्याजवळ त्याला जुने भांडणाच्या कारणावरून आकाश अरवत ,लक्ष्यु अरवत आणि इतर आठ ते दहा जणांनी मिळून मारहाण केली. त्याला मंद्रुप येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात सोहेल (मित्र) यांनी दाखल केले.

कुत्र्याच्या हल्ल्यात बालक गंभीर जखमी

सोलापूर, दि.२ ऑगस्ट-

कुत्र्याने हल्ला करून चावा घेतल्याने ४ वर्षाचा बालक जखमी झाला. ही घटना जुना तुळजापूर नाका येथील रघोजी ट्रान्सपोर्ट जवळ शनिवारी दुपारच्या सुमारास घडली.आशीर्वाद राहुल तरटे (रा. सावळेश्वर ता.मोहोळ) असे जखमीचे नाव आहे. तो शनिवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास रघोजी ट्रान्सपोर्ट जवळील शेतात बसला होता. त्यावेळी अचानक कुत्र्याने त्याच्यावर हल्ला केला. त्याला उपचारासाठी राहुल तरटे (वडील) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

भांडण सोडवण्यास गेलेल्या महिलेस मारहाण

सोलापूर, दि.२ ऑगस्ट-

घरातील भांडण सोडवण्यास गेली असता दगड आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत ३० वर्षीय महिला गंभीर जखमी झाली. ही घटना घोडेश्वर (ता.मोहोळ) येथे शनिवारी रात्रीच्या सुमारात घडली. बबीता सचिन सूर्यवंशी (वय-३० रा. घोडेश्वर) असे जखमीचे नाव आहे. शनिवारी रात्री आठ वाजेच्या सुमालास घरात भांडण चालू असताना त्या सोडवण्यास गेल्या.त्यावेळी समाधान भोई, बाबू गवळी आणि अन्य दोघांनी मिळून त्यांना मारहाण केली. तिला उपचारासाठी रंजना (सासू) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात गंभीर अवस्थेत दाखल केले.

शेतीच्या वादातून महिलेस कोयत्याने मारहाण

सोलापूर, दि.२ ऑगस्ट-

शेतीच्या वादातून एका ६० वर्षीय महिलेस कोयता आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना पितापूर (ता. अक्कलकोट) येथे आज रविवारी सकाळच्या सुमारास घडली. शाहिदा मकुम चिक्कली (रा.पितापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. रविवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास त्यांच्या शेतातील घराजवळ त्यांना जहीरोदीन चिक्कली, मिरासाहेब चिक्कली आणि इतर ५ जणांनी मिळून मारहाण केली.त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात रियाज (मुलगा) यांनी दाखल केले.

चंद्रभागेने ओलांडली इशारा पातळी

नदीपात्रात १ लाख ८ हजार क्युसेकचा प्रवाह

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर,दि.२ ऑगस्ट -

उजनी व वीर धरणातून अनुक्रमे भीमा व नीरा नदीत सोडण्यात येत असलेल्या पाण्याच्या लोंढ्यामुळे सद्यस्थितीत पंढरपुरातील चंद्रभागा नदीतून १ लाख ५ हजार ९७९ क्युसेकचा प्रवाह वाहत आहे. नदीने धोक्याची इशारा पातळी ओलांडली आहे. दरम्यान संभाव्य पूर परिस्थितीचा सामना करण्यासाठी नगरपालिका प्रशासन पूर्णपणे सज्ज असल्याचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले आहे.

पंढरपूर शहरातील चंद्रभागा नदीकाठच्या भागातील नागरिकांनी सुरक्षेबाबत दक्षता घ्यावी. नगरपालिका प्रशासनामार्फत रायगड भवन, पंढरपूर येथे नागरिकांना राहण्याची व्यवस्था केली आहे. संभाव्य पूर परिस्थितीमुळे बाधित होणाऱ्या नागरिकांच्या जीवनावश्यक वस्तू नेण्यासाठी नगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत वाहनांची व्यवस्था केली आहे. स्थलांतरित करण्यात येणाऱ्या नागरिकांना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती मार्फत मोफत भोजन व्यवस्था केल्याचेही मुख्याधिकारी रोकडे यांनी सांगितले.

प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे : नगराध्यक्षा भालके

चंद्रभागा नदीकाठच्या नागरिकांनी पूर परिस्थितीच्या वेळी प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे असे आवाहन नगराध्यक्ष प्रणिता भालके व उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे यांनी केले आहे.

पी.एस.टेक्निकल हायस्कूलमध्ये आंतरशालेय स्पर्धा उत्साहात

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २ ऑगस्ट-

पी. एस. इंग्लिश मीडियम टेक्निकल हायस्कूल येथे स्व. श्री. रतनचंदजी सखाराम शहा यांच्या स्मरणार्थ विविध शाळांतील विद्यार्थ्यांच्या सहभागातून आंतरशालेय स्पर्धेचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत हस्ताक्षर, चित्रकला व रंगभरण, पोस्टर मेकिंग आणि वक्तृत्व या स्पर्धांचा समावेश होता. सोलापूर शहर व परिसरातील अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. स्पर्धे दरम्यान विद्यार्थ्यांनी आपली कला, सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि वक्तृत्व कौशल्याचे प्रभावी सादरीकरण केले. परीक्षकांनी सर्व स्पर्धकांच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेच्या ट्रस्टी व सीईओ देवई शहा, मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे, सर्व शिक्षकवृंद, इतर शाळेचे प्रतिनिधी व पालकवर्ग उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

विमानसेवा पूर्ववत; ४८ प्रवाशांचे विमान गेले मुंबईला

दृश्यमानतेच्या कारणावरुन २८ जूनपासून होते बंद

सोलापूर-मुंबई विमानसेवा झाली सुरु

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २ ऑगस्ट-

येथील होटगी रोडवरील विमानतळावरून २८ जूनपासून बंद असलेली सोलापूर ते मुंबई विमानसेवा स्टार एअरलाईन कंपनीकडून रविवार, दि. २ ऑगस्टपासून पुन्हा सुरू झाली. ४८ प्रवाशांनी विमान तिकीट बुकिंग केले आणि मुंबईकडे ते मार्गस्थ झाले तर विमानात येताना ३३ प्रवाशी संख्या होती. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या विशेष प्रयत्नांमुळे सोलापूर-मुंबई विमानसेवा पुन्हा सुरू झाली आहे.

दृश्यमानतेच्या कारणावरून २८ जूनपासून स्टार एअरलाईनची सोलापूर-मुंबई विमानसेवा बंद करण्यात आली होती. या मार्गावरील विमानसेवा बंद झाल्याने व्यापारी, उद्योजक, रुग्ण तसेच नोकरदार वर्गाची मोठी गैरसोय होत होती. सोलापूरकरांनी ही सेवा तत्काळ सुरू करण्याची मागणी केली होती. आता विमानसेवा सुरू झाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

आणि आज

दरम्यान, अद्यापही सोलापूर-गोवा विमानसेवा ही बंद राहणार आहे. बंद विमानसेवेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक घेऊन तत्काळ विमानसेवा सुरू करण्याचे मध्यंतरी निर्देश दिले होते. भारतीय विमानतळ प्राधिकरणाने नोटीसही बजावली होती. यामुळेच आता मुंबई- सोलापूर विमानसेवा सुरू झाली पहिल्या दिवशी ४८ प्रवाशी घेऊन विमानाने मुंबईकडे धाव घेतली होती.

ही विमानसेवा जवळपास ७१ दिवस बंद राहणार होती. या मार्गावरील विमानसेवा बंद झाल्याने व्यापारी, उद्योजक, रुग्ण तसेच नोकरदार वर्गांची मोठी गैरसोय होत होती. सोलापूरकरांनी ही सेवा तात्काळ सुरू करण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्टार एअरलाइन कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून सोलापूर ते मुंबई विमानसेवा तात्काळ सुरू करण्याबाबतचे निर्देश दिले होते. त्याचबरोबर मुख्यमंत्री कार्यालयाकडूनही कंपनीला विमानसेवा सुरू करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील नागरिकांची यामुळे मोठी गैरसोय होत असल्याची बाब आ. कोठे यांनी पालकमंत्री गोरे आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्याही निदर्शनास आणून दिली. श्री. गोरे यांनी दिल्ली येथे केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडेही याबाबत पाठपुरावा केला होता आणि या प्रयत्नांना यश आले आहे.

मेहता प्रशालेत शहरस्तरीय कॅरम स्पर्धा उत्साहात

सोलापूर, दि. २ ऑगस्ट-

कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शहर कॅरम स्पर्धेचे उत्साही वातावरणात आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत शहरातील प्रमुख शाळांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर जिल्हा कॅरम असोसिएशनचे उपाध्यक्ष व माजी प्राचार्य वैजनाथ हत्तुरे, जिल्हा कॅरम असोसिएशनचे सचिव प्रा. डॉ. शिवानंद तोरवी, शालेय नियामक मंडळ सदस्य सुरेशबाबु मंकणी आणि मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी उपस्थित पाहुण्यांचा सन्मानचिन्ह देऊन तसेच विविध शाळांमधून विद्यार्थ्यांना घेऊन आलेल्या मार्गदर्शक शिक्षकांचाही विशेष सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना कॅरम खेळाचे महत्त्व, बारकावे आणि क्रीडा क्षेत्रातील संधींविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर सर्व प्रमुख पाहुण्यांनी कॅरम बोर्डवर स्वतः २ ते ३ डाव खेळून अत्यंत रंगतदार आणि अनोख्या पद्धतीने या स्पर्धेचे अधिकृत उद्घाटन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक अमित कोर्टीकर यांनी केले.

वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटलच्या सर्जिकल युनिटचे लोकार्पण

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २ ऑगस्ट -



डी मार्ट फाऊंडेशनने एन. एम. वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटलला दिलेल्या साडेसहा कोटी रुपयांच्या देणगीतून, चार मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्स, शस्त्रक्रियेसाठी लागणारी अद्ययावत मशीनरी तसेच सर्जिकल आयसीयू मधील विविध उपकरणे यासह तयार झालेल्या सर्जिकल विभागाचे आज रविवारी शानदार उद्घाटन झाले.

यानंतर वाडियाचे चेअरमन प्रवीणसिंह परदेशी यांच्या हस्ते डी मार्ट चे डायरेक्टर आणि एन भास्करन, CSR Head जयदीप सोमण यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री भास्करन यांनी तयार झालेल्या सगळ्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले. आपले मनोगत व्यक्त करताना भास्करन यांनी म्हटले की, D mart नाही तर अजून कोणी तरी हा भार उचलला असता पण आज आम्ही या डेव्हलपमेंटचा भाग झालो. आज इथे उपस्थित राहता आले. याचा मला आनंद आहे. डॉक्टर हे ईश्वराचेच रूप आहे. ये हॉस्पिटल बढिया हुआ है... त्यांनी असेही सांगितले की, आम्ही आजपर्यंत शिक्षणासाठी CSR निधी दिले आहेत. अवघ्या ७ महिन्यात सर्व काम पूर्ण झाले हे पाहून छान वाटले.

मुख्यमंत्री कार्यालयाचे आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी यांनीही डी मार्टच्या या देणगीबद्दल आणि त्यांच्या सहकार्याबद्दल एका मोठया विभागाचा म्हणजे ऑपरेशन थिएटर्स आणि सर्जिकल युनिटचा भार उचलला म्हणून कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या सारख्याच अनेकांकडून सहकार्य मिळत आहे. नावाजलेले अनुभवी डॉक्टर आज या हॉस्पीटल चा भाग बनले आहेत. त्यांनी पुढील योजनांची माहिती दिली आणि लवकरच हे हॉस्पिटल १०० बेड्सचे होणार असल्याचे सांगितले.

या उद्घाटन प्रसंगी बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष राम रेड्डी, महानगरपालिकेच्या स्थायी समिती अध्यक्ष रंजिता चाकोते, डी मार्टचे व्हाईस प्रेसिडेंट जयदीप सोमण, उत्तम पाटील, निलेश सांगोडकर, वाडिया हॉस्पिटलचे सचिव शिरीष गोडबोले व गव्हर्निंग कौन्सिल चे सर्व सदस्य उपस्थित होते. सूत्र संचालन सेवाव्रती तृप्ती बापट यांनी केले. मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर सोडल यांनी आभार मानले.

जामश्री रिअलटी लिमिटेड
सीआयएन :L17111PN1907PLC000258
नोंदणीकृत कार्यालय : फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३ ००१
दूरध्वनी : ०२२-४५७८२५७९ इमेल आयडी : jammill1907@gmail.com वेबसाईट : www.jamshri.in

वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

येथे सूचना देण्यात येत आहे की जामश्री रिअलटी लिमिटेड (**कंपनी**) ची ११८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (**एजीएम**) मंगळवार, २५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (**वीसी**) / इतर दृकश्राव्य माध्यमांद्वारे (**ओएवीएम**) आयोजित केली जाईल. ही सभा कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (**एमसीए**) द्वारे जारी केलेल्या २२ सप्टेंबर २०२५ च्या सामान्य परिपत्रक क्रमांक ३/२०२५ आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया द्वारे वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या परिपत्रकांचे (यापुढे एकत्रितपणे '**परिपत्रके**' म्हणून संदर्भित) तसेच इतर सर्व लागू कायद्यांचे पालन करून घेतली जाईल, ज्यामध्ये एजीएमच्या सूचनेत नमूद केलेले कामकाज करण्यासाठी आयोजित करण्यात येणार आहे.

एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल अशा भागधारकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ईमेलद्वारे पाठवला जाईल, ज्यांच्या ईमेल पत्त्यांची कंपनी किंवा रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट आणि डिपॉझिटरीजकडे नोंदणी झालेली आहे. ज्या भागधारकांच्या ईमेल पत्त्यांची कंपनी/ पूर्वा शेअर रजिस्ट्री/ डिपॉझिटरीज/ डिपॉझिटरी पार्टिसिपंट यांच्याकडे नोंदणी झालेली नाही, त्यांना आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल अचूक लिंक उपलब्ध असलेल्या वेबलिंकचे पत्र पाठवले जाईल. एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाइट www.jamsheri.in , बीएसई ची वेबसाइट www.bseindia.com आणि पूर्वा शेअरजिस्ट्रीची वेबसाइट https://evoting.purvashare.com वर देखील उपलब्ध असेल.

ज्या भागधारकांनी त्यांच्या ईमेल पत्त्याची नोंदणी केलेली नाही, त्यांना एजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या कामकाजावर रिमोट ई-व्होटिंगद्वारे किंवा सभेदरम्यान ई-व्होटिंग प्रणालीद्वारे दूरस्थपणे आपले मत नोंदवण्याची संधी मिळेल. डिमटेरिअलाईज्ड आणि भौतिक स्वरूपात शेअर्स बाळगणाऱ्या भागधारकांसाठी दूरस्थपणे मतदानाची पद्धत भागधारकांना पाठवल्या जाणाऱ्या सूचनेत दिली जाईल.

ज्या शेअरधारकांनी प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण केले आहेत आणि ज्यांनी कंपनीकडे त्यांचे ईमेल पत्ते/केवायसी तपशील अद्यावतीकरण केलेले नाहीत त्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे ईमेल पत्ते/केवायसी फॉर्म आयएसआर -१ आणि संबंधित फॉर्म पूर्वा शेअरजिस्ट्र (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट्स, युनिट क्रमांक ९, शिव शक्ती इंडस्ट्रीज इस्टेट, जे. आर. बोरिचा मार्ग, लोअर परळ (पूर्व), मुंबई-४०००११ या पत्त्यावर पाठवून अद्यवत करावेत. डिमटेरियलाइज्ड पद्धतीने शेअर्स धारण करणाऱ्या शेअरधारकांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे ईमेल पत्ते/केवायसी संबंधित डिपॉझिटरी सहभागींकडे नोंदणी/ अद्यवत करावेत.

भागधारक एजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या कामकाजावर इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे ('ई-व्होटिंग') आपले मत नोंदवू शकतात. डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात, फिजिकल स्वरूपात शेअर्स बाळगणाऱ्या आणि ज्या सदस्यांनी आपल्या ईमेल पत्त्याची नोंदणी केलेली नाही अशा सदस्यांसाठी दूरस्थपणे मतदानाची ('रिमोट ई-व्होटिंग') पद्धत एजीएमच्या सूचनेत दिली गेली आहे. ज्या भागधारकांनी एजीएम पूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारे आपले मत नोंदवले आहे, ते देखील एजीएमला उपस्थित राहू शकतात परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार असणार नाही. एजीएमला उपस्थित राहणारे भागधारक ज्यांनी रिमोट व्होटिंगद्वारे मतदान केलेले नाही, ते एजीएममध्ये मतदान करू शकतील.

सदस्य वीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएमला उपस्थित राहू शकतील. या संदर्भातील माहिती, ज्यामध्ये लॉगइन क्रेडेंशियल्स आणि एजीएमला उपस्थित राहण्यासाठी फॉलो करायच्या पायऱ्यांचा समावेश आहे, ती एजीएमेच्या सूचनेत स्पष्ट केली आहे

सभासदांची नोंदवही आणि कंपनीच्या समभागांच्या संबंधातील भाग हस्तांतरण पुस्तके दि.१९/०८/२०२६ ते २५/०८/२०२६ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत बंद राहतील.

जामश्री रिअलटी लिमिटेड करिता
सही/-
राजेश दमाणी
संयुक्त व्यवस्थापकीय सहसंचालक

तारीख : ०३.०८.२०२६
ठिकाण : सोलापूर

कोण संजय राऊत? मी ओळखत नाही!

पालकमंत्री गोरे यांचा पत्रकारांना प्रतिसवाल

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २ ऑगस्ट-

शिवसेना 'उबाठा'चे प्रवक्ते तथा खासदार संजय राऊत यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर खालच्या पातळीवर केलेल्या टीकेच्या निषेधार्थ खा.राऊत यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाबाबत पालकमंत्री जयकुमार गोरे यांना विचारले असता, कोण संजय राऊत? मी त्यांना ओळखत नाही, असा उपरोधिक प्रतिसवाल केला. यावेळी उपस्थित आमदारांनाही त्यांनी हाच सवाल केल्याने एकच हशा पिकला.

रविवारी पालकमंत्री सोलापूर दौऱ्यावर असताना खा.संजय राऊत यांच्या विरोधात भाजप कार्यकर्त्यांनी येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयासमोर आक्रमक आंदोलन केले होते. सांगोला येथेही मोठे आंदोलन झाले. या आंदोलनावेळी भाजप कार्यकर्त्यांनी संजय राऊत यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत त्यांचा प्रतिकात्मक पुतळाही जाळला.

मंत्र्यांवर आणि नेत्यांवर केलेल्या टिकेमुळे कार्यकर्त्यांनी चांगलाच रोष व्यक्त केला. खा.संजय राऊत यांच्या त्या वक्तव्याविरोधात नगरसेवक मनिष केत यांनी फौजदार चावडी पोलिसात तक्रार दाखल केली. या पार्श्वभूमीवर पत्रकारांनी त्यांना छेडले होते. यावेळी आ.देवेंद्र कोठे, आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.राजेंद्र राऊत, माजी आमदार राम सातपुते उपस्थित होते.

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि. सोलापूर सब डि. व बार्शी पैकी वैराग येथील शेतजमीन गट नं. १४ याचे क्षेत्र 0 हे.५0 आर, आकार 0 रु.३४ पैसे पो.ख.0.0५.00 आर यासी चतुःसिमा पुर्वेस- हिंगणी रोड, पश्चिमेस- नागनाथ पांढरमिसे, दक्षिणेस- महिपती पांढरमिसे व उत्तरेस- गट नं.१५ ची जमीन येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक शेतजमीन आतील सर्व झाडझुडूपे वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह.

उपरोक्त वर्णन केलेली शेतजमीन ही बजरंग गणपती पांढरमिसे यांचे स्वतंत्र मालकी व कब्जेवहिवाटीची होती व आहे व आजरोजी प्रत्यक्ष मालकी हक्कात व कब्जेवहिवाटीत आहे. विद्यमान मालकांनी सदरची शेतजमीन त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेली आहे. सदर शेतजमीन मिळकत खरेदी घेण्याबाबत आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्या दरम्यान सदर शेतजमीनी मिळकतीबाबत खरेदी घेण्याबाबत बोलणे झालेले असून खरेदी देणाऱ्यांनी आमचे अशिलाकडून इसार म्हणून काही रकमेचा मोबदला स्वीकार केलेला आहे. सदर शेतजमीन मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची खरेदी देण्याची ग्वाही व भरवसा शेतजमीन मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे.

तरी वर नमुद शेतजमीनीवर कोणाचा हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास सदर शेतजमीन संदर्भात कोणी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, बँक बोजा, वाटणीपत्र, मृत्युपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर शेतजमीनवर कोणाचा बोजा हक्क, हितसंबंध असल्यास तसेच मोजणी संबंधी काही तक्रारी, हरकती असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 0८ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्यावर कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर शेतजमीन निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदी पुर्व जाहीर नोटीस दिली असे. ता.0३/0८/२0२६

सही/-
रोहित राजेंद्र घोडके
ॲडव्होकेट
वैराग नगरपंचायत जवळ, वैराग
ता. बार्शी, जि. सोलापूर
मो. ९८८१८४१५९५
अशिलातर्फे ॲडव्होकेट

Stock investors: Do you track your portfolio return?

SALIENT POINT

SAURABH MITTAL

My client, Roy, a senior professional, decided to take up a second job. Dedicating evenings and weekends, he spent years researching stocks and making investment decisions. After five years, I asked: "How much did this second job pay you over the years?" Roy answered: "I don't know."

Sounds unbelievable. If you are spending time and effort on an activity to earn more, measuring the outcome should be obvious. Yet many investors do this with direct equity. "I want to generate higher returns than what I would get by outsourcing my equity investments or investing passively," said Roy. But then comes the important question: Are you measuring whether you are actually achieving this goal?

Roy, like many direct equity investors, can instantly recall successful investments. "I bought this stock at ₹200; today it is at ₹1,000." That is undoubtedly a good outcome, but it tells only a part of the story.

What matters is the collective performance. What happened to the stocks that did not work? How much weight did you give to winners versus losers? How long was cash lying idle?

The only way to answer these questions is to measure portfolio-level returns generated on your cash flows. At what rate did your overall portfolio grow? Technically, extended internal rate of return (XIRR) is the appropriate way to evaluate the actual investor experience.

Without measurement, improvement is almost impossible.

Making money is not enough. Equity markets generally create wealth over long periods, so a positive return does not prove success. The relevant question is: Did your effort create additional value?

Compare your portfolio with the Nifty 50 Total Return Index (TRI). Suppose your direct equity portfolio generated 10 per cent annually while the Nifty 50 TRI delivered 12 per cent. You did create wealth, but you spent hours researching companies, tracking results and making decisions, only to underperform a passive alternative.

In that case, you effectively did a fund manager's job but were not paid for it. Your "salary" for the additional effort was supposed to be the extra return, or alpha, generated over the benchmark. Without that extra return, your hard work and emotional strain went uncompensated.

